RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक १४४] बुधवार, ऑक्टोबर २५, २०१७/कार्तिक ३, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३४९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**जलसंपदा विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ ऑक्टोबर २०१७

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५.**

क्रमांक मजनिप्रा. २०१७/२६६/(६१/२०१७)/जसं (आस्था).—ज्याअर्थी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (२००५चा महा.१८) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ३ मधील पोट-कलम (५) व कलम ४ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) व (ख) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी, निवड समितीने शिफारस केल्यानुसार जलसंपदा विभागाची अधिसूचना क्र. मजनिप्रा. २०१६/२७७/(९१/२०१६)/जसं (आस्था), दिनांक ५ मे २०१७ द्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३च्या पोट-कलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून श्री. कल्याणेश्वर प्रसाद बक्षी यांची व श्री. विनय माधव कुलकर्णी यांची जलसंपदा अभियांत्रिकी क्षेत्रातील तज्ञ म्हणून सदस्य पदी त्या पदावर रुजू झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी किंवा त्यांच्या वयाची सत्तर वर्षे पूर्ण होईपर्यंत यांपैकी जो दिनांक आधी येईल त्या दिनांकापर्यंत नियुक्ती केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग), (घ) व (ङ) द्वारे उक्त प्राधिकरणाच्या सदस्य पदांवर अर्थव्यवस्था, भूजल व्यवस्थापन व विधी या क्षेत्रांतील तज्ञ व्यक्तींची नेमणूक करणे आवश्यक आहे ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (२००५ चा महा.१८) च्या कलम ३ मधील पोट-कलम (५) व कलम ४ मधील पोट-कलम (१) च्या खंड (ग), (घ) व (ङ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, उक्त अधिनियमाच्या कलम ५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीने शिफारस केल्यानुसार उक्त प्राधिकरणावर पुढील व्यक्तींची सदस्य (अर्थव्यवस्था), सदस्य (भूजल व्यवस्थापन) व सदस्य (विधी) म्हणून त्या पदावर रुजू झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी किंवा त्यांच्या वयाची सत्तर वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जो दिनांक आधी येईल त्या दिनांकापर्यंत नियुक्ती करीत आहेत.

(१) डॉ. शिवाजी त्रिंबकराव सांगळे (अर्थव्यवस्था क्षेत्रातील तज्ञ) ... सदस्य

(२) डॉ. रतन चंद जैन (भूजल व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ञ) ... सदस्य

(३) श्री. विनोदकुमार जमुनाशंकर तिवारी (विधी क्षेत्रातील तज्ञ) ... सदस्य

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**इ. सिं. चहल,**
शासनाचे प्रधान सचिव.

## WATER RESOURCES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 24th October 2017

*NOTIFICATION*

MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ACT, 2005.

No. MWRRA. 2017/266/(61/17)/WR(Estt).—Whereas the Governor of Maharashtra has, on the recommendation of the Selection Committee, *vide* Government Notification, Water Resources Department, No. MWRRA.2016/277/(91/16)/WR (Estt), dated the 5th May 2017, issued in exercise of the powers conferred by sub-section (*5*) of section 3 read with clauses (*a*) and (*b*) of sub-section (*1*) of section 4 of the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (Mah. XVIII of 2005) (hereinafter referred to as "the said Act"), appointed Shri Kalyaneshwar Prasad Bakshi as a Chairperson and Shri Vinay Madhav Kulkarni an expert from the field of water resources engineering as a member of the Maharashtra Water Resources Regulatory Authority constituted under sub-section (*1*) of section 3 of the said Act for a term of three years from the date on which they enter upon their offices or till they have attained the age of seventy years, whichever is earlier ;

And whereas, it is expedient to appoint experts from the fields of economics, ground water management and law as members on the said Authority under clauses (*c*), (*d*) and (*e*) of sub-section (*1*) of section 4 of the said Act ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*5*) of section 3 read with clauses (*c*), (*d*) and (*e*) of sub-section (*1*) of section 4 of the said Act, the Governor of Maharashtra, on the recommendation of the Selection Committee constituted under section 5 of the said Act, hereby appoints the following persons as members of the said Authority, for a term of three years from the date on which they enter upon their offices or till they have attained the age of seventy years, whichever is earlier, namely :—

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Dr. Shivaji Trimbakrao Sangle<br>(Expert from the field of economics) | ... | Member |
| 2. | Dr. Ratan Chand Jain<br>(Expert from the field of ground water management ) | ... | Member |
| 3. | Shri Vinodkumar Jamunashankar Tiwari<br>(Expert from the field of law) | ... | Member |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

I. S. CHAHAL,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.